BAB613

Total No. of Printed Pages: 03

**B.A. B. Ed Semester - VI**
**EXAMINATION MAY 2023**
**Marathi Paper X - प्रसारमाध्यमांसाठीची लेखनकला**
**(Writing Skills for Media)**

**[Time: 2 Hours]** **[Max. Marks: 70]**

**प्र.1** खालील कोणत्याही **तीन** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. १५

१. ग्रंथ परीक्षणाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. नाट्यपरीक्षण करण्यामागील निकष कोणते?

३. कथेचे किंवा कादंबरीचे पटकथेत रूपांतर करताना कोणते मुद्दे लक्षात घ्यावे लागतात ?

४. वर्तमानपत्रातील 'वाचकांचा पत्रव्यवहार' या सदराचे महत्त्व सांगा.

५. मुद्रितशोधन करताना मुद्रित शोधकाने कोणती पथ्ये पाळणे आवश्यक असते ?

**प्र.2** खालील कोणत्याही **तीन** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. १५

१. दिवाळी अंकाच्या संपादनातील महत्त्वाचे घटक कोणते?

२. स्मरणिका संपादनाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. चित्रपट परीक्षण करताना कोणत्या घटकांचा विचार करावा लागतो?

४. भाषांतर म्हणजे काय ? भाषांतराची आवश्यकता नमुद करा.

५. भाषांतराचे प्रकार सांगा.

**प्र.3** तुम्ही पाहिलेल्या कोणत्याही एका नाटकाचे परीक्षण लिहा १०

**किंवा**

तुम्ही पाहिलेल्या कोणत्याही एका चित्रपटाचे परीक्षण लिहा.

**प्र.4** अ. समाजात बलात्काराच्या घटनात वाढ होऊ लागली आहे. याविषयी समाजाला मार्गदर्शन करणारे तुमचे विचार दैनिक 'लोक' मधील 'वाचकांचा पत्रव्यवहार' या सदरासाठी लिहून पाठवा. ०५

**किंवा**

तुमच्या गावातील पाणीपुरवठा सुरळीत नसल्याची तक्रार करणारे पत्र दैनिक 'युवा' मधील 'वाचकांचा पत्रव्यवहार' या सदरासाठी लिहून पाठवा.

ब. पुढे दिलेल्या मूळ उताऱ्याच्या आधारे त्याखालील दिलेल्या मुद्रित उताऱ्याचे मुद्रितशोधन करा. ०५

**मूळ उतारा**

अक्षर सरळ रेषेत असावे. त्यावर शिरोरेखा आवश्यक असतात. लेखन करताना दोन शब्दांतील, दोन ओळीतील अंतर सारखे असावे. लेखनात खाडाखोड नसावी. ते प्रमाणबद्ध असावे. अक्षर गिचमीड नसावे. अक्षरांची उंची सर्वत्र सारखी असावी. लिहिताना विरामचिन्हांचा जरूर तेथे वापर करावा. सुलेखनात उत्तम हस्ताक्षराबरोबर शुद्धलेखनाचाही समावेश असतो. शुद्धलेखन याचा अर्थ व्याकरणाच्या नियमांस अनुसरून केलेले लेखन होय. लेखन साधारणपणे उच्चारानुसार असते. उच्चार शुद्ध असले व त्यानुसार लेखन केलेले असले की ते बरेच शुद्ध असते. सुलेखनासाठी लेखनाचा सराव सातत्याने करावा. काळजीपूर्वक लेखन करावे.

**मुद्रित उतारा**

अक्षर सरळरेषेत असावे. त्यावर शीरोरेखा आवश्यक असतात. लेखन करताना दोन शब्दांतिल, दोन ओळीतील अंतर सारखे असावे. लेखनात खाडाखोड नसावी. ते प्रमाणबद्ध असावे. अक्षर गीचमीड नसावे. अक्षरांची उंची सर्वत्र सारखी असावी. लिहीतांना विरामचिन्हांचा जरूर तेथे वापर करावा. सुलेखन उत्तम हस्ताक्षराबरोबर शुद्धलेखनाचाही समावेश असतो. शुद्धलेखन याचा अर्थ व्याकरणाच्या नियमांस अनुसरून केलेले लेखन होय. लेखन साधारणपणे उच्चारानसार असते. उच्चार शुद्ध असले व त्यानुसार लेखन केलेले असले की ते बरेच शुद्ध असते. सुलेखनासाठी लेखनाचा सराव सातत्याने करावा. काळजी पूर्वक लेखन करावे.

**प्र.5** अ. 'क्रीडा' या क्रीडाविषयक विशेषांकाचे शीर्षकपृष्ठ अनुक्रमणिकेसहित तयार करा. १०

**किंवा**

ब. पुढील कथानकाच्या आधारे पटकथा लिहा.

आई वडिलांपासून दुरावलेला एक अजाण बालक यात्रेत हरवतो. चोरी करणा-या टोळीला सापडतो. कातक-याच्या वस्तीवर दिवस काढावे लागतात. कातक-याच्या वस्तीतील नवरा-बायकोचे जोडपे त्याचे संगोपन करते. काही वर्षे त्याच्याकडे राहून घरी परततो. वडिलांनी दुसरे लग्न केलेले असते. आई घरी नसते. आई एका ठिकाणी व वडील दुसरीकडे. परत कातक-याच्या वस्तीत येतो.

प्र.6 पुढील इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. १०

Have a glance at the life of a farmer. Let hunger strike their children, the wife of the farmer, keeping stone on her heart, preserves the leftover grains for sowing. you may say, "How mad she is!" She is laying the precious grains into soil, instead of feeding her children. But she knows that those grains are going to multiply in thousands. This is the process of rising again. Our youth should have daring spirit and patience like her.